पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

*दिनांक- १३/१२/२०१९*

## नक्षलविरोधात मौजा कनगडी येथील नागरिकांचा आक्रोश

- **नक्षलवाद मुर्दाबाद म्हणत केली नक्षलबॅनरची होळी.**

उपविभाग धानोरा अंतर्गत येणाऱ्या पोलीस मदत केंद्र, सावरगाव हद्दीतील सावरगाव ते ग्यारापत्ती रोडवर मौजा कनगडी नजिक नक्षलवाद्यांनी नागरिकांमध्ये दहशत निर्माण करण्यासाठी लाल कापडी बॅनर लावले होते.

मौजा कनगडी येथील ग्रामस्थांनी एकत्र येवून नक्षलवाद्यांनी लावलेले बॅनर काढून नक्षलवाद मुर्दाबाद, लोकशाही जिंदाबादच्या घोषणा देत बॅनरची होळी केली. यावेळी मोठ्या प्रमाणावर नागरिक उपस्थित होते.

नक्षलवादी हे स्वत:च्या फायद्यासाठी नक्षल सप्ताह किंवा इतर गोष्टींचे निमित्त पुढे करत दहशत पसरविण्यासाठी बॅनर लावतात. या गोष्टींचा निषेध व्यक्त करत. नागरिकांनी संविधान व लोकशाहीच्या विरोधात असणाऱ्या नक्षलवाद्यांचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला.

जल- जंगल- जमीनीची खोटी स्वप्ने दाखवत नक्षलवादी हे आंम्हा आदिवासी बांधवांचा खून करतात. त्याचबरोबर काहीही कारण नसतांना नक्षलवादी रस्त्यावर झाडे पाडून आमच्या जाण्या- येण्याच्या मार्गात अडथळे निर्माण करतात. यामुळे जीवनावश्यक गरजा मिळविण्यासाठी आम्हांला मनस्ताप सहन करावा लागतो. या सर्व गोष्टींना आमचा कडाडून विरोध असल्याचे गावकऱ्यांनी सांगितले.

नक्षलवाद्यांनी लावलेला बॅनर जाळत तीव्र निषेध व्यक्त करणाऱ्या मौजा कनगडी ग्रामस्थांचे जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांनी कौतुक केले असुन जिल्हाभरातील नागरिकांना नक्षलवाद्यांच्या भूलथापांना बळी न पडता नक्षलवाद्यांचा तीव्र निषेध करण्याचे आवाहन केले आहे.







